प्रेसनोट दि. १९/०५/२०१८

## चिंचवड येथील स्पा मसाज सेंटरवर छापा
### ३ सज्ञान मुलींची वेश्या व्यवसायतुन सुटका
### स्पा मालक अटकेत

दि.१८/०५/२०१८ रोजी सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखेकडील पोलीस निरीक्षक श्री.संजय पाटील, यांना पोलीस नाईक नितीन लोंढे यांचे कडुन माहीती मिळाली की, **"स्पा ग्लो"** गावडे बिल्डींग, स.नं ७९९/६, चिंचवडगाव पुणे येथील मसाज सेंटरमध्ये इसम नामे अविनाश देवीदास जोगदंड हा मसाज पार्लर मध्ये ठेवलेल्या थेरपीस्ट महिलांचेकडुन मसाजचे नावाखाली वेश्या व्यवसाय करुन घेत आहे. अशी खात्रीशीर माहिती मिळाली, त्यावरुन अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष गुन्हे शाखा पुणे शहरचे पोलीस निरीक्षक श्री. संजय पाटील व सामाजिक सुरक्षा विभागाकडील अधिकारी, कर्मचारी तसेच चिंचवड पोलीस स्टेशनकडील पोलीस निरीक्षक श्री. विठठल कुबडे यांनी संयुक्त कारवाई करुन चिंचवडगांव परिसरातील **"स्पा ग्लो"** गावडे बिल्डींग येथील दुस-या मजल्यावर चालत असलेल्या स्पा मसाज सेंटरमध्ये वेश्या व्यवसाया बाबत खातरजमा करुन तेथे छापा टाकला. छाप्या दरम्यान नेपाळ देशाची १ व पुणे शहरातील २ अशा एकुण ३ सज्ञान मुलींची वेश्याव्यवसायातुन सुटका करुन त्यांना वेश्या व्यवसायास लावणारा अविनाश देवीदास जोगदंड वय २२ वर्षे रा. रुम नंबर ११४, सिध्दार्थ हौसींग सोसायटी, निगडी पुणे याचे विरुध्द चिंचवड पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर १८७/२०१८ अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध अधिनियम. १९५६ कलम ३,४,५ सह भा.दं.वि.क. ३७० अ, (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी अविनाश जोगदंड यास कारवाईचे वेळी ताब्यात घेण्यात आले आहे.

कारवाईचे वेळी रोख रु. ५५००/- रुपये, २ मोबाईल फोन, लिव्ह अँड लायसन्स करारनामा, हिशोबाच्या डाय-या, बँक चेकबुक व इतर मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. तसेच या गुन्ह्यातील पिडीत मुलींना रेस्क्यु होम, महमंदवाडी, हडपसर येथे संरक्षणकामी ठेवण्यात आले आहे.

वरील नमुद कारवाई ही मा.श्री.प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा.श्री.पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे, मा. श्री. भानुप्रताप बर्गे, सपोआ, गुन्हे-२, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.संजय पाटील, सपोनि चंद्रकांत जाधव, प्रमोद म्हेत्रे, नितीन तरटे, रमेश लोहकरे, राजेश उंबरे, नितीन लोंढे, नितिन तेलंगे, संदीप गायकवाड, सचिन शिंदे, गीतांजली जाधव, कविता नलावडे, ननिता येळे, सुप्रिया शेवाळे, रुपाली चांदगुडे यांनी व चिंचवड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. कुबडे व त्यांचे स्टाफसह सयुंक्तीक कारवाई केली आहे.